महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १३ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये; यासाठी शासन प्रयत्नशील

## महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**राज्यातल्या तीव्र कुपोषित बालकांची संख्या २०१९-२० मध्ये २४६ होती. ती २०२५-२६ मध्ये ९७ पर्यंत कमी झाल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत चर्चेच्या उत्तरात दिली. एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी महिला आणि बालविकास, आरोग्य, आदिवासी विकास या संबंधित विभागांचा गट तयार करण्यात येईल, असंही तटकरे म्हणाल्या.**

उमा खापरे यांनी कुपोषणामुळे बालकांच्या होणाऱ्या मृत्यूसंदर्भात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य सर्वश्री संजय खोपडे, प्रवीण दरेकर, चित्रा वाघ यांनी सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांपर्यंत योग्य गौरवाने पोहोचावा, याबाबत राज्य सरकार कटिबद्ध आहे. यासाठी पाठपुरावा अधिक वेगाने केला जाणार असल्याचं राज्यमंत्री पंकज भोयर यांनी अर्धातास चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

सत्यजित तांबे यांनी सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याबद्दल चर्चा उपस्थित केली होती. यावेळी सदस्य अमोल मिटकरी, ज.मो.अभ्यंकर हे चर्चेत सहभागी झाले होते. अमोल मिटकरी यांनी अस्सल चरित्र साधन समिती अद्याप गठित न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

# लोकनेते दि. बा. पाटील विमानतळ नामकरणासाठी स्त्रीशक्ती रस्त्यावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नेवाळी : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी लोकनेते दि. बा. पाटील विमानतळ नामकरणासाठी बुधवारी स्त्रीशक्ती रस्त्यावर उतरली आहे.**

भूमिपुत्रांनी उभारलेल्या या विराट आंदोलनाला महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिव्यातील आगासन गावात महिलांची विशेष सभा पार पडली आहे. गावातील विविध पाड्यांतून निघालेल्या जनआक्रोशाने परिसर पेटून उठला होता. महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गावोगाव जनजागृती करत आगामी मोर्चासाठी कणा मजबूत करण्याचे काम हाती घेतले आहे. भिवंडीसह कल्याण डोंबिवली सह परिसरातील भूमिपुत्र या पायी दिंडीत लक्षणीय सहभाग घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर आता भूमिपुत्रांची महिला शक्ती देखील रस्त्यावर उतरण्याची तयारी करत असल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याची दिले होते. या नामकरणासाठी अनेक आंदोलन भूमिपुत्रांनी केली आहेत. मात्र आश्वासनांच्या पलीकडे भूमिपुत्रांच्या पदरात काही पडलेच नाही. त्यामुळे 22 डिसेंबरपासून भिवंडी ते नवी मुंबई विमानतळ अशी पायी यात्रा निघणार असून या यात्रेत महिलांची उपस्थिती लक्षणीय राहणार आहे. आंदोलनाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचा सहभाग वाढवण्याचे धोरण यावेळी बैठकीत स्पष्ट करण्यात आले आहे. "विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नावहा भावनांचा प्रश्न असून भूमिपुत्रांच्या अस्मितेची ही लढाई आहे," अशा शब्दांत महिलांनी आपली भूमिका ठाम केली. दिवा, डोंबिवली, भोपर, कल्याण, श्री मलंगगड परिसरातील महिला कार्यकर्त्या गेल्या काही दिवसांपासून सतत जनसंपर्कात असून घराघरातून महिलांना यात्रेत सहभागी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### महायुतीबाबत रवींद्र चव्हाणांचं मोठं विधान

# महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणूक महायुती एकत्र लढवणार !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**नागपूर/12** - गुरुवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जात भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी चर्चा केली. आगामी महापालिका निवडणुकांबाबत दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला. या चर्चेतून येत्या महापालिकांमध्ये महायुती म्हणून निवडणूक लढवण्याचा वरिष्ठ नेत्यांनी ठाम निर्णय घेतला आहे. त्यात स्थानिक पातळीवर ४-५ नेत्यांच्या समन्वय समिती नेमली जाईल. मुंबई, ठाणे यासारख्या प्रमुख महापालिकांबाबत वरिष्ठ स्तरावर १०० टक्के महायुती करण्याचा निर्णय नेत्यांनी घेतला असल्याची घोषणा भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली. नागपूर येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, महापालिका निवडणुकीत महायुती म्हणून सकारात्मकपणे पुढे गेले पाहिजे असा निर्णय पक्षाने घेतला आहे. त्यासाठी प्रत्येक महापालिका निवडणुकीच्या स्तरावर ४-५ प्रमुख नेत्यांची समिती बनवली जाईल. ही समिती महायुतीबाबत प्राथमिक स्वरुपात चर्चा करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीचं सरकार आहे. त्यात जनतेच्या हित याला प्राधान्य देणे महत्वाचे आहे. भविष्यातील लोकहित आणि विकासात्मक धोरणातून सकारात्मक संदेश खालच्या स्तरापर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी महायुती म्हणूनच निवडणूक लढण्याचा सकारात्मक दृष्टीकोन आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच राजकारणात वैर हा शब्द कधी असूच शकत नाही. राजकारणात मित्रत्व कधी होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे इतर गोष्टीचा विचार न करता जनतेचे हित हे फार महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्या त्या दृष्टीने ज्या ज्या शक्यता आहे त्याचा विचार महायुतीत करण्याचं काम वरिष्ठ पातळीवर करण्याचा निर्णय झाला आहे. महायुती म्हटलं तर त्यात सर्व घटक पक्ष शिंदेसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि इतरही पक्ष आहेत. त्यामुळे सर्वच पक्षातील नेत्यांची कमिटी तयार करून त्या त्या पातळीवर निर्णय घेण्याचे महायुतीत ठरले आहे असंही रवींद्र चव्हाण यांनी म्हटलं.

दरम्यान, सर्वच गोष्टीची चर्चा जाहीरपणे होणे अपेक्षित नाही. परंतु एक गोष्ट सकारात्मकपणे महायुतीबाबतीत निर्णय होणे हे महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. २९ महापालिका आहेत, त्या त्याठिकाणी असलेली परिस्थिती रोज बदलत जाते. पूर्वीची आणि आताची परिस्थिती बदललेली आहे. त्यामुळे प्रमुख नेत्यांची जी समिती बनवली आहेत ते जागावाटपाबाबत निर्णय प्रक्रिया करतील आणि अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवर ठरवला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार हे प्रदीर्घ अनुभव असणारे नेते आहेत. हे तिघेही फार विचार करून महाराष्ट्राला आवश्यक काय आहे याचा निर्णय घेत असतात. त्यामुळे यापुढेही ते निर्णय घेतील अशीही माहिती रवींद्र चव्हाण यांनी दिली.

# देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचं निधन

### राजकारणातील स्वच्छ प्रतिमेचा अंतिम प्रवास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विशेष प्रतिनिधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज विश्वनाथ पाटील चाकूरकर यांचं आज पहाटे लातूर इथल्या निवासस्थानी निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून त्यांची तब्येत ढासळली होती. त्यांच्यावर घरीच उपचार सुरू होते. पाटील यांनी लोकसभेच्या अध्यक्षपदासह केंद्र सरकारमधील अनेक महत्त्वाची पदे भूषवली होती. ते लातूर मतदारसंघातून सात वेळा लोकसभेवर निवडून गेले होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पाटील यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. समाज माध्यमावरील संदेशात प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे की, पाटील हे एक अनुभवी नेते होते. ते समाजाच्या कल्याणासाठी योगदान देण्यास खूप उत्सुक होते.



**26/11 मुंबई हल्ल्यांनंतर राजीनामा**

**2008 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यांनंतर सुरक्षेतील त्रुटींवर देशभर टीका झाली. या हल्ल्यांची नैतिक जबाबदारी स्वीकारत शिवराज पाटील चाकूरकर यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या कारकिर्दीतील हा सर्वात मोठा राजकीय धक्का मानला जातो.**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाटील यांना श्रद्धांजली वाहिली. पाटील हे महाराष्ट्राच्या राजकीय मूल्यांना जपणारे आणि त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उंचावणारे एक प्रतिष्ठित आणि सुसंस्कृत नेते होते असं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोक चव्हाण यांनी पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. पाटील यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता वरवंटी इथं अंत्यसंस्कार करण्यात येतील.

## महत्वाचे

# श्री मलंगगड रस्त्यावर धुळीचा कहर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ तालुक्यातील श्री मलंगगड परिसरात निर्माण झालेल्या प्लांटच्या धुळीमुळे मलंगगड परिसर गुदमरला असून यामुळे नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. श्री मलंगगडवाडी ते करवले गावादरम्यानच्या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांमुळे उठणारी प्रचंड धूळ आणि प्लांटमधून बाहेर पडणारे सूक्ष्म कण दिवसेंदिवस वाढत असून परिसर धुळीच्या सततच्या धुरकट वातावरणात गच्च अडकून पडला आहे. या मार्गाचा उपयोग शालेय विद्यार्थी, नोकरदार कामगार, शेतकरी तसेच स्थानिक ग्रामस्थ रोजच्या प्रवासासाठी करतात. मात्र, वाढत्या धुळीच्या प्रदूषणामुळे त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होऊ लागले असून श्वसनाचे विकार, डोळ्यांची जळजळ, अंगावर चिखलमिश्रीत धूळ बसणे यांसारख्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत.

श्री मलंगगड वाडी ते करवले रस्ता अरुंद असून दोन्ही बाजूंनी आरएमसी प्लांटशी संबंधित कंटेनर, ट्रक आणि मालवाहू वाहने उभी असल्याने धूळ रस्त्यावरच साठून राहते. वाहनांच्या चाकांखाली ही धूळ पुन्हा हवेत उडून वातावरणात तरंगत राहते. त्यामुळे दिवसा देखील रस्त्यावर दाट धुळीचे ढग पसरलेले दिसतात आणि काही अंतराच्या पलीकडे नजरही पोहोचत नाही. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना नाकावर रुमाल दाबून, डोळे मिटूनच मातीच्या या धुरकट रस्त्यातून वाट काढावी लागते. कामगार वर्गालादेखील दररोज या धुळीतून प्रवास करताना श्वसनाचा त्रास जाणवतो.

# बंद अवस्थेतील सरकत्या जिन्यांमुळे डोंबिवलीतील प्रवाशांची नाराजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक ३ आणि ४ वर कल्याणच्या दिशेकडे असलेला नुकताच सुरू झालेला सरकता जिना पुन्हा बंद पडल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. तीन महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या या सुविधेचा उपयोग प्रवाशांना होईल, अशी अपेक्षा असताना हा जिना वारंवार बंद पडत असल्याने प्रवासी संतप्त झाले आहेत. हा जिना बंदच ठेवायचा असेल, तर मग जुन्याच पद्धतीचा पायऱ्यांचा जिना बांधला असता तर योग्य झाले असते, अशा संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांकडून येत आहेत. प्रवाशांच्या तक्रारींची दखल घेत मनसेने डोंबिवली स्टेशन मास्तरांची भेट घेतली. हा जिने तात्काळ दुरूस्त करा, करण्यासाठी अन्यथा मनसे स्टाईलने रेल्वे प्रशासनाविरोधात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेचे माजी नगरसेवक ॲड. मनोज घरत यांनी दिला आहे. डोंबिवलीतील सरकता जिना चालू असतो, मात्र बहुतांशी वेळ तो बंद असतो. त्यामुळे प्रवाशांना पुन्हा जुन्याच पद्धतीने पायऱ्या चढून स्कायवॉकवर किंवा फलाटावर जावे लागते. गेल्या दीड वर्षांपासून रेल्वे स्थानकात नूतनीकरणाचे काम सुरू असल्याने प्रवाशांना वळसा घेऊन मोठ्या त्रासाने प्रवास करावा लागत होता. सरकता जिना सुरू झाल्यावर प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला होता. परंतु गर्दीच्या मुख्य वेळेत विशेषतः सकाळ आणि सायंकाळी तोच जिना बंद राहत असल्याने प्रवाशांचा नाराजीचा पारा चढला आहे.

# यंदा वाड्याची जलचिंता वाढणार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डिसेंबरचा दुसरा आठवडा उलटला तरी वैतरणा, तानसा, पिंजाळी, गारगाई व देहेर्जा या पाच नद्यांवरील १७ केटी बंधाऱ्यांचे दरवाजे अजूनही बंद केले नाहीत. हे दरवाजे उघडे असल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असून त्याचा फटका वाडावासीयांना बसणार आहे. तालुक्याला जानेवारीपासूनच पाणीटंचाईचे चटके सहन करावे लागणार असल्याने ग्रामस्थांचे हाल होणार आहेत. शिवाय शेतीलाही पाणी कुठून आणणार, असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे. वाडा तालुक्यातील पाच नद्यांवर केटी बंधारे बांधण्यात आले. कोरडवाहू पिकांना या पाण्याचा उपयोग होतो. या बंधाऱ्यांमुळे पाणी साठवता येते. साधारण दिवाळीनंतर त्याचे दरवाजे बंद करणे आवश्यक असते. त्यादृष्टीने नियोजनदेखील पाटबंधारा विभागामार्फत केले जाते. यंदा मात्र हे नियोजन फेल गेले आहे. नद्यांवर बांधलेल्या बंधाऱ्यांचे दरवाजे बंद न केल्यामुळे नदीचे पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे. परिणामी जानेवारीपासूनच पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ वाडा तालुक्यातील वाड्यावस्त्यांवर येणार आहे.

# निवडणूकीसाठी वाहन तपासणीचा विद्यार्थ्यांना फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** राज्य निवडणूक आयोगाने संपूर्ण अंबरनाथ आणि बदलापुरातील पाच प्रभागांची निवडणूक पुढे ढकलल्याने आता येत्या २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे महिनाभरापासून उघडण्यात आलेल्या तपासणी चौक्यांजवळ हालचाली वाढल्या असून गुरूवारी अंबरनाथ आणि बदलापूर शहराच्या वेशीवर भरारी पथकांनी पोलिसांच्या मदतीने वाहने तपासणी केली. मात्र या तपासणीमुळे प्रवेशद्वारांवर मोठी वाहतूक कोंडी झाली. शाळेतून सुटलेल्या विद्यार्थ्यांच्या वाहनांनाही याचा फटका बसला. आनंदनगर येथील अंबरनाथच्या प्रवेशद्वारावर, काटई अंबरनाथ मार्गावर मोठी कोंडी झाली. त्यामुळे वाहनचालक संताप व्यक्त करत होते. संपूर्ण अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगर परिषदेतील पाच प्रभागांच्या निवडणुका अचानक पुढे ढकलल्याने येथील प्रशासकीय व्यवस्थाही तितक्या काळयासाठी वेठीस धरली गेली आहे. निवडणुका घोषीत झाल्यानंतर शहराच्या प्रवेशद्वारांवर तापसणी चौक्या उभारल्या जातात. शस्त्रे, बेकायदेशी पैसे आणि कायदा सुव्यवस्था बिघडतील अशा वस्तूंवर लक्ष ठेवण्यासाठी या चौक्यांमधून तपासणी केली जाते.






# शिवसह्याद्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून लोहगड सफाई मोहीम फत्ते






**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील शिवसह्याद्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून 60 जणांच्या चमुने ऐतिहासिक लोहगड किल्ले सफाई मोहीम कचरा वेचून, स्वच्छता करीत फत्ते करण्यात आली.

शिवसह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र, विभाग कल्याण यांच्या मार्फत सामाजिक बांधलिकीचा वसा जोपसत तळागाळातील वर्गातील मदतीचा हात देत अभिनव लोक उपयोगी उपक्रम राबविले जातात. याअनुषगांने गड किल्ले सवर्धन ऐतिहासिक वारसा, माहितीसह आजच्या पिढीला गड किल्ले यांचे ऐतिहासिक महत्त्व पुरातन वसा जोपसण्यासाठी कल्याण पूर्वेतील शिवसह्याद्री प्रतिष्ठान दर वर्षी गड किल्ले सफाई मोहिम राबवितात. शिवभक्त सदस्य, युवक, युवती जेष्ठ व्यक्ती यांच्यासह गड किल्ले दर्शन घडवित गड किल्ले यावर जात कचरा, प्लास्टिक बाटल्या, काचेचे तुकडे गोळा करून संकलित करून कचर्याची योग्य ती विल्हेवाट लावत गड किल्ले स्वच्छता मोहीम राबिवितात.

यापूर्वी रायगड, शिवनेरी, सिंहगड, राजगड किल्ले स्वच्छता मोहिम राबविली असून समाजापुढे योग्य आर्दश घातला आहे. यंदाच्या वर्षी पुणे जिल्ह्यातील लोणावळा नजीक छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील लोहगड किल्ले स्वच्छता, सफाई मोहिम राबविण्यात आली. यावेळी चमुतील युवक युवतींना प्रोबधन करीत लोहगडाचे ऐतिहासिक महत्त्व सांगण्यात आले. एकीकडे मोबाईलचा अति वापर, व्यसनाधीनतेकडे वळू पाहणारी युवा पिडीला आपल्या पूर्वजाचा इतिहास शरीर संपदा यांचे महत्त्व देखील यानिमित्ताने पटविण्यात आले.

गडावरील रस्त्यालगत ठिक ठिकाणी संकलित केलेला कचरा चमूने गडावरील कचराकुंडीत टाकून लोहगड स्वच्छता सफाई मोहीम फत्ते केली. तसेच गडावरील तलाव पाणवठा परिसर कचरामुक्त केला. या मोहीमेचे नियोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतीश पेडणेकर यांच्यावतीने करण्यात आले होते. मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रदेश अध्यक्ष शरद बिरामणे, उपाध्यक्ष संजय पाटील, खजिनदार उमेश रेडेकर यांचे योगदान महत्वपूर्ण होते.

# शिवसेना कल्याण पूर्व उपशहर प्रमुख पदी प्रवीण भालेराव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : शिवसेना कल्याण पूर्व उपशहर प्रमुख पदी कल्याण पुर्वेतील सामाजिक कार्यकर्ते प्रवीण भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सुचनेनुसार, कल्याण जिल्हाप्रमुख



गोपाळ लांडगे यांच्या निर्देशाने उपजिल्हाप्रमुख मल्लेश शेट्टी आणि कल्याण पूर्वेचे शिवसेना शहरप्रमुख निलेश शिंदे यांच्या हस्ते प्रवीण भालेराव यांची शिवसेनेच्या कल्याण पूर्व उपशहर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. पक्ष संघटना वाढीसाठी आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करणार असल्याचे भालेराव यांनी यावेळी सांगितले.

# गव्हाण हायस्कूलमध्ये शालेय विज्ञान प्रदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : ही आहे विज्ञानाची दुनिया चला पाहूया बालवैज्ञानिकांची किमया विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या बाल वैज्ञानिकाचा शोध घेत त्यांच्यातील वैज्ञानिक संकल्पनांना पुष्टी देण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण- कोपर येथे 9 डिसेंबर 2025 रोजी शालेय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या अनुषंगाने विज्ञान प्रदर्शनाची पूर्वतयारी म्हणून विद्यालयात शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेत उस्फूर्त सहभाग नोंदवून विविध शैक्षणिक साहित्यांची आणि वैज्ञानिक प्रकल्पांची निर्मिती केली होती. या तयार वैज्ञानिक प्रकल्पात आणि शैक्षणिक साहित्यात



विद्यालयातील विज्ञान शिक्षकांनी मार्गदर्शन करून त्या साहित्याला आणखीन दर्जेदार बनवण्यासाठी विद्यार्थ्यांना सहाय्य केले आणि या प्रकल्पांची तयारी करत 9 डिसेंबर रोजी विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन विद्यालयात करण्यात आले.

यावेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच तथा पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य सौ रत्नप्रभा घरत यांच्या शुभहस्ते विज्ञान प्रदर्शनाचे शानदार उद्घाटन संपन्न झाले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करत रोबोटच्या सहाय्याने प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर साहेब, विश्वनाथ कोळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत ,सौ. योगिता भगत, सुधीर ठाकूर, वैभव घरत या मान्यवरांच्या उपस्थितीत विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न झाले. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या सौ.ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका सौ.शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

या शालेय विज्ञान प्रदर्शनात 5 वी ते 9 वी अखेर 34 प्रकल्पांची मांडणी करण्यात आली होती. यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर, चांद्रयान, ग्रीन सिटी, ज्वालामुखी उद्रेक, जलशुध्दीकरण आणि अनेक वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित प्रकल्प मांडण्यात आले होते. मान्यवर प्रकल्पाची पाहणी करत असताना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे देत आपल्या प्रकल्पाचे उद्दिष्ट समजावून सांगितले. विज्ञान प्रदर्शन प्रमुख एस.के.भोईर आणि सौ.सी. एन.ठाकूर यांनी या शालेय विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन केले होते.

# आरटीई कायद्यामधील सुधारणांबाबत शिक्षण क्रांती संघटनेचे लेखी निवेदन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ हा संसदेत सन २०१० साली मंजूर झाल्यानंतर जुलै २०११ पासून त्याची टप्प्या टप्प्याने देशभर अंमलबजावणी सुरु झाली. RTE Act 2009 चा हवाला देत सर्व राज्य सरकारांनी एकेक कलमांची अंमलबजावणी करण्याबाबत वेळोवेळी GR निर्गमित केले. महाराष्ट्र शासनाने दि. १३ फेब्रु., २०१३ रोजी T.E.T. लागू करण्याचा GR हा यापैकीच एक GR आहे. त्यामुळे या तारखेनंतर इ.१ ली ते ८ वीच्या वर्गांना T. E. T. पात्रता धारकांचीच नियुक्ती होऊ लागली. (RTE Act 2009, कलम २३(१))

दि. १ सप्टेंबर, २०२५ च्या मा. सर्वोच्च न्यायालच्या निर्णयानुसार (सिव्हिल अपिल नं. १३८५/२०२५ व अन्य निर्णय दि.१/९/२०२५) TET पात्रता प्राथमिक शिक्षकांसाठी अनिवार्य असल्याबाबत नमूद आहे, तर TET पात्रता धारण केल्याशिवाय पदोन्नतीस पात्र नसल्याचेही स्पष्ट केले आहे. हा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने RTE Act 2009 चा संदर्भ देऊन दिलेला असला तरी तो नैसर्गिक न्याय तत्वाशी विसंगत असल्याबाबत सर्वांचेच मत आहे. त्यामुळे आपला दि. १३.०२.२०१३ च्या शासन निर्णयापूर्वी सेवेत आलेल्या प्राथमिक शिक्षकांना TET ची सक्ती करता येणार नसल्याचे मान. सर्वोच्च न्यायालयास शासनाने अवगत करून त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी राज्य शासनास टाळता येणार नाही.

" RTE Act 2009 राज्य शासनाने स्विकारल्या नंतर ती ती राज्य सरकारे ज्या ज्या वेळी RTE समाविष्ट कलमांची अंमलबजावणी लागू करतील तेव्हापासून त्या राज्यातील प्राथमिक शाळांसाठी ती लागू होतील. यासाठी RTE ची



संपूर्ण अंमलबजावणीसाठी कमाल कालमर्यादा निश्चित करावी" अशा प्रकारची सुधारणा दुरुस्ती प्रस्तावात सूचविल्यास ते उचित ठरेल.

. दि. १५ मार्च २०२४ च्या संच मान्यता GR बाबत :- मा. बॉम्बे उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक ५४५६/२०२५ च्या निर्णयानुसार दि. १५.३.२०२४ चे संच मान्यतेचे निकष RTE नुसार वैध ठरवण्यात आले (निर्णय दि. १४.११.२०२५) यामुळे राज्यातील अनेक शाळांमध्ये संच मान्यतेमध्ये शून्य शिक्षक दिसणार आहेत ज्यामुळे या शाळा बंद पडणार आहेत. बंद पडणाऱ्या या असंख्य शाळा त्यावेळी समाज सुधारकांनी गोर गरीबांना शिक्षण मिळावे म्हणून स्वतःच्या जमिनी देऊन व पदरमोड करून सुरू केल्या होत्या. शहरी भागातील या बंद पडणाऱ्या शाळांमधील विद्यार्थी हे मोलमजुरी करून घर चालवणाऱ्या अत्यंत हलाखीत जगणाऱ्या पालकांची मुले आहेत. तर खेडोपोडी असणाऱ्या शाळांतील विद्यार्थी हे गरीब शेतकरी व इतर छोटे छोटे व्यवसाय करणाऱ्या अत्यंत गरीब कुटुंबांतील मुले आहेत.

RTE Act 2009 हा इ.१ ली ते ८ वीच्याच वर्गांना लागू आहे. इ.९ वी ते १२ वीतील वर्गांना शिक्षक संख्या ठरवण्याचे धोरण पूर्णतः राज्य शासनाच्या अखत्यारीत आहे.


RTE कायदा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आहे. परंतु या नवीन संच मान्यतेच्या धोरणामुळे शिक्षण प्रवाहातील मूले प्रवाहाबाहेर फेकली जाणार आहेत. हे जेव्हा विद्यार्थी व पालकांना जाणवेल तेव्हा त्यांच्यामध्ये शासनाविरोध असंतोष निर्माण होईल व विद्यार्थी व पालकच रस्त्यावर उतरली

शिक्षक हे राष्ट्राची बलशाली, ज्ञानी व सुसंस्कृत पिढी घडवण्याचे पवित्र कार्य करताहेत. अशा आदर्श व्रत शिक्षकांना आंदोलने करण्याची वेळच खरंतर शासनाने येऊ द्यायला नको. विद्यार्थी तिथे शाळा व शाळा तिथे शिक्षक हे धोरण शासनाने स्विकारणे अपेक्षित आहे. समस्यामुक्त शिक्षक असतील तर ते अधिक प्रभावीपणे व समर्पित भावनेने ज्ञानदानाचे काम करतील. शिक्षकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन शासनाने सकारात्मक ठेवला तर आपला शिक्षक झोकून देऊन काम करेल व हा भारत देश विकसित करण्यासाठी सक्षम व समर्थ पिढी राष्ट्राला देईल हे निश्चित.

स्वयं अर्थसहाय्यित शाळांमुळे शिक्षकांना मिळाणारे तुटपुंजे वेतन, NPS मुळे निर्माण झालेले अंधःकारमय सेवानिवृत्त जीवन, RTE च्या नावाने चाललेली पटसंख्या शिक्षक संख्येची कत्तल !!! यातून मार्ग काढावा जेणे करून ही पिढी मागास राहणार नाही.

शेवटी शासन हेच गोर गरिबांचे मायबाप आहेत यासाठी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस, कोकण विभाग अध्यक्ष रमेश निवृत्ती जाधव, कोकण विभाग सचिव ज्ञानेश्वर गोसावी, कल्याण महानगर चे अध्यक्ष गजानन श्रीराम पाटील. यांनी राज्याचे शिक्षण प्रधान सचिव व विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई विभागाचे राजेश कंकाळ यांना लेखी पत्र दिले आहे.

# भ्रष्टाचार निर्मूलन समितीची रायगड जिल्हा आढावा बैठक



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. तात्यासाहेब उदुगुंडे पाटील यांच्या सूचनेनुसार पिंपरी-चिंचवड, पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमदृष्टी स्मारक येथे अलिबाग तालुका (रायगड जिल्हा) पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक उत्साहात आणि सेवाभावाच्या वातावरणात पार पडली.

समाजातील अन्याय, शोषण आणि अनियमितते विरुद्ध लढा देण्याच्या दृढनिश्चयाने भरलेली ही बैठक पदाधिकाऱ्यांना नवी प्रेरणा देणारी ठरली.भ्रष्टाचार निर्मूलन समिती ही जनतेच्या न्यायासाठी उभी असलेली, समस्यांचे समाधान आणि भ्रष्टाचारा विरुद्ध ठोस कारवाई करणारी एक सामाजिक चळवळ असून, पारदर्शक आणि जबाबदार शासनव्यवस्था निर्माण करण्याचा तिचा मुख्य उद्देश आहे. या कार्यपद्धतीत जनजागृती, तक्रार निवारण, पडताळणी, आणि कायदेशीर मार्गाने भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न सतत केला जातो. याच धर्तीवर या बैठकीतही पुढील वाटचालीवर चर्चा झाली.

या बैठकीस महाराष्ट्रातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची प्रेरणादायी उपस्थिती लाभली. यात महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष शांताराम गणेश खुडे, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष चंद्रकांत लोढे, महाराष्ट्र प्रदेश सचिव (कायदा सल्लागार) वकील अशोक धायगुडे, तसेच पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष महादेव आडगुडे यांचा समावेश होता. वरिष्ठांनी भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने वाटचालीसाठी कार्यकर्त्यांना मनोबल देत सखोल मार्गदर्शन केले. रायगड जिल्ह्यातूनही प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उत्साहपूर्वक उपस्थित होते. यात रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश टेमकर, उपाध्यक्ष मनोज पाटील, कार्याध्यक्ष संदेश पाटील (अलिबाग), अलिबाग तालुका अध्यक्ष सुरेश पाटील, अलिबाग तालुका संपर्कप्रमुख रत्नाकर धुमाळ, पेण तालुका सचिव किशोर भोईर, तसेच नवनिर्वाचित सदस्य संजय भगत आणि सचिन पाटील यांचा समावेश होता. सर्वांनी प्रांजळपणे कार्याची जबाबदारी स्वीकारत भ्रष्टाचाराविरुद्ध निष्पक्षपणे उभे राहण्याची प्रतिज्ञा केली.

बैठकीत भ्रष्टाचाराविरोधी जनजागृती मोहीम अधिक व्यापक करणे, प्रशासनातील अनियमिततेवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथके उभारणे, नागरिकांच्या तक्रारी त्वरित सोडवण्यासाठी मजबूत यंत्रणा उभी करणे आणि पारदर्शक कार्यपद्धती राबवण्याचे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीतील वातावरण सेवाभाव, प्रामाणिकता आणि समाजासाठी काहीतरी करण्याच्या भावनेने भारलेले होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी भ्रष्टाचारमुक्त रायगड आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी एकदिलाने, निर्भयपणे आणि प्रामाणिकपणे कार्यरत राहण्याचा दृढनिश्चय व्यक्त केला.

# गांजा अमली पदार्थ बाळगून वाहतूक करणारे दोन जण ताब्यात

## वासिंद स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : गांजा हा अमली पदार्थ विक्री करीता जवळ बाळगून त्याची वाहतूक करणाऱ्या दोन जणांना वासिंद स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ठाणे ग्रामीण पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रात मनोव्यापारावर परिणाम करणारे अंमली पदार्थाची खरेदी विक्री व वाहतूक करणाऱ्या बाबत योग्य ती माहिती मिळवून त्यावर कारवाई करण्याबाबत पोलिस अधीक्षक डॉ.डी.एस.स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पो.नि. संदीप गीते यांनी अशा कारवाई करणे कामी विशेष पोलीस पथके तयार करून मार्गदर्शन केले होते.

सदर पोलीस पथके अमली पदार्थांची विक्री व वाहतूक बाबत माहिती मिळवत असताना दि. 5 डिसेंबर रोजी पो.ह.संतोष सुर्वे व पो.शि. स्वप्नील बोडके यांना गस्ती दरम्यान गुप्त बातमीदाराने दिलेल्या



बातमीवरून शहापूर तालुक्यातील खर्डी जवळील मौजे गोलभन गाव हद्दीत डायमंड हॉटेल समोर मुंबई -नाशिक महामार्गाच्या मुंबई वाहिनीचे बाजूला गांजा या अमली पदार्थ विक्री करीता जवळ बाळगून त्याची वाहतूक करीत असताना आरोपीत आसिफ गणी शेख उर्फ पिंजारी (वय 40) व विपूल श्रीकृष्ण मोरे (वय 30) दोन्ही रा. शहापूर यांनी आपसात संगणमत करून आपले ताब्यातील सफेद रंगाचे टाटा सफारी कार क्रमांक एमएच 15 सीटी 5555 या वाहनांमध्ये 1 लाख 20 हजार रुपये किंमतीचा एकूण 4 किलो 52 ग्राम वजनाचा गांजा अमली पदार्थ विक्री करीता जवळ बाळगून त्याची वाहतूक करीत असताना मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले.


याबाबत त्यांच्या विरुद्ध शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस उपनिरीक्षक महेश कदम, दीपेश किणी, पो. हवा. संतोष सुर्वे, सतीश कोळी, पो.ना. योगेश शेळकंदे व पो. शि. स्वप्निल बोडके सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण या पथकाने केलेली असून गुन्हाचा पुढील तपास पो.उपनिरीक्षक दीपेश किणी नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण हे करीत आहेत.

# भिवंडी डंपिंग ग्राउंडच्या प्रश्नावर अधिवेशनात लक्षवेधी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर महानगरपालिका उद्यानासाठी आरक्षित शांतीनगर परिसरातील मैदानावर जंतुनाशक औषध फवारणी प्रक्रिया न करता कचरा टाकत असल्याप्रकरणी भिवंडी पूर्व' विधानसभा मतदारसंघाचे आमदार रईस शेख यांनी आज शुक्रवारी नागपूर येथे सुरु असलेल्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सादर केली. त्यावर उद्योग मंत्री उदय सामंत यांनी डंपिंग ग्राउंडची हाताळणी 'एनजीटी'च्या मानकांनुसार करण्याबाबत महानगर पालिकेला आदेश दिले जातील असे सांगितले.

भिवंडी महापालिका कार्यक्षेत्रात दररोज सुमारे ४५० मेट्रीक टन कचरा साठत असतो मनपाच्यावतीने गोळा करण्यात आलेल्या कचऱ्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया केली जात नसल्याने तो डंपिंग ग्राऊंडवर तसाच पडलेला असतो त्यामुळे या



कचऱ्याला मोठ्या प्रमाणात दुर्गंधी सुटत असते त्यामुळे शांतीनगर राम नगर,चाविंद्रा या परिसरातील रहिवाशी दुर्गंधी मुळे हैराण आहेत. गेल्या २० वर्षात महापालिका येथे डंपिंग ग्राउंड करु शकली नसल्याची माहिती आमदार रईस शेख यांनी शासनाला दिली आहे. या डंपिंग ग्राऊंड बाबतीत येथील नागरिकांनी वारंवार आंदोलन तक्रारी करून डंपिंग ग्राऊंड बंद करण्याची मागणी केली आहे.

याप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. शासनाचे नगरविकास विभाग

### डंपिंग ग्राउंडची हाताळणी एनजीटी' मानकानुसार होणार

काहीही करत नाही. मुंबई महानगर क्षेत्रात सामुहिक नागरी सुविधा उभारण्याचे 'एमएमआरडीए'ने परिपत्रक काढले आहे. पण, त्यावर लक्ष दिले जात नसल्याची तक्रार आ.शेख यांनी मांडली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री उदय सामंत म्हणाले, ठाणे जिल्हाधिकारी यांनी डंपिंग ग्राउंडसाठी जागा मंजुर केली आहे.नवे डंपिंग ग्राऊंड होईपर्यंत, आहे त्या डंपिंग ग्राउंडची हाताळणी 'राष्ट्रीय हरित लवादा'च्या मानकानुसार करण्याचे महानगरपालिकेला आदेश दिले जातील. तसेच याप्रकरणी १५ दिवसात विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेवून प्रश्न तातडीने सोडवला जाईल, असे आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी आमदार शेख यांना दिले आहे.

# भविष्यवेध



शनिवार

१३ डिसेंबर २०२५

**मेष**
जोडीदाराशी बोलताना थोडे सौम्यपणे बोला, संयम ठेवल्यास नाते वाचेल. नियमित योगासने आरोग्य सुधारतील. काही कामांमध्ये जास्त वेळ लागू शकतो.

**वृषभ**
प्रकल्पामुळे भविष्यात तुम्हाला फायदा होईल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल. कठोर परिश्रम करून ते त्यांच्या करिअरमध्ये यश मिळवतील.

**मिथुन**
बालपणीच्या मित्राचा फोन येऊ शकतो. या संभाषणामुळे काही जुन्या आठवणी जाग्या होतील. अपूर्ण व्यवसाय पूर्ण होईल. नवीन व्यवसाय करार होऊ शकतात.

**कर्क**
तुमची संपत्ती वाढवण्याच्या तुमच्या योजना यशस्वी होऊ शकतात. व्यवसाय वाढेल. सगळं मनासारखं होईल. प्रगतीच्या काही नवीन संधी मिळू शकतात.

**सिंह**
परस्पर समजूतदारपणा आणि प्रेमामुळे तुमचे वैवाहिक नाते अधिक मजबूत होईल. तुमचे सामाजिक जीवनही सर्व प्रकारे सुधारेल.

**कन्या**
कामाच्या ठिकाणी तुमच्या कामाबद्दल तुम्हाला प्रशंसा मिळेल. आर्थिक स्थिती सुधारेल. ऑफीसमध्ये तुमच्या कामाचे कौतुक होऊ शकते.

**तुळ**
काही कामे पूर्ण करण्यासाठी आळस सोडावा लागेल, नाहीतर यश दूर जाईल. तुमच्या चांगल्या वागण्याने तुमच्या सभोवतालच्या लोकांना आनंद होईल.

**वृश्चिक**
तुमची चांगली प्रतिमाही उजळेल. तुम्हाला समाजात योग्य तो आदर आणि सन्मान मिळू शकेल. एखादा मित्र काही वैयक्तिक कामे पूर्ण करण्यास मदत करू शकेल.

**धनु**
तुमच्या कुटुंबात शांती आणि आनंद नांदेल. एखाद्या खास व्यक्तीची भेट घेऊ शकता. महत्वाच्या निर्णयावर मोठ्यांचे मार्गदर्शन घ्या आणि निर्णय घ्या.

**मकर**
व्यवसायात अडकलेले पैसे मिळू शकतात. एखाद्या विशिष्ट कामात इतरांकडून मदत मिळू शकते. प्रत्येक निर्णयाला कुटुंबातील सदस्य पाठिंबा देतील.

**कुंभ**
कुटुंबासह धार्मिक स्थळाला भेट द्याल. देवदर्शनाने बरं वाटेल. तुमच्या मित्रमंडळात वाढ होऊ शकते. आर्थिक लाभ अपेक्षित आहे. तुमच्या कामात नवीन संधि मिळेल.

**मिन**
दोघांमधील जवळीक वाढेल. कामात बदल होण्याची शक्यता आहे. परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची स्वप्ने साकार होऊ शकतात.



# आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर महाराष्ट्रात

## एमएमआरडीए आणि ब्रुकफिल्ड कंपनी यांच्या संयुक्त नेतृत्वात प्रकल्प उभारणार

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि व्यवसाय-अनुकूल वातावरण या तीन घटकांमुळे महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी अग्रगण्य ठरत आहे. यावर्षी जाहीर केलेले नवीन GCC धोरण राज्यात उच्च मूल्याच्या, कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

ब्रुकफिल्ड कंपनीने मुंबईतील पवई येथे 6 एकर जागेवर 20 लाख चौरस फूट भाडेतत्वावरील बांधकाम असलेला भव्य प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत बहुराष्ट्रीय बँकेचे आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) स्थापन केले जाणार आहे. हा करार 20 वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला आहे.





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या मोठ्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीबाबत जागतिक स्तरावर विश्वास दृढ झाला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या भविष्यातील गरजा पूर्ण करण्याबरोबरच, स्थिर आणि सक्षम वातावरण पुरवण्यास राज्य शासन तत्पर आहे.

सदर प्रकल्प 2029 पर्यंत पूर्ण होणार असून, यामध्ये 1 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे तसेच 30,000 हून अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) व ब्रुकफिल्ड यांच्या नेतृत्वाखाली भागीदार बी. एस. शर्मा यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, ही उभारणी महाराष्ट्रातील गुंतवणूकदार-अनुकूल वातावरणाबाबत जागतिक कंपन्यांचा वाढता विश्वास अधोरेखित करणारी आहे. प्रकल्पासाठी 100 टक्के हरित उर्जेचा वापर करण्याचे उद्दिष्ट असून इमारत बाजारातील सर्वोत्तम शाश्वत बांधकाम मानकांनुसार उभारली जाणार आहे. यामुळे मुंबईचे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर हब म्हणूनचे स्थान आणखी मजबूत होणार आहे.

2024 मध्ये ब्रुकफिल्डने पुण्यात एका मोठ्या वित्तीय सेवा कंपनीसाठी 'बिल्ड-टू-सूट' टॉवर उभारला होता. याच वर्षी MMRDA सोबत 12 अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. जून 2025 मध्ये कंपनीने बांद्रा-कुर्ला संकुलात 2.1 एकर जागा खरेदी केली आहे.

ब्रुकफिल्डचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी अंकुर गुप्ता म्हणाले , "आशिया खंडातील कार्यालय विकास क्षेत्रात नवा मापदंड ठरेल असा हा आयकॉनिक प्रकल्प आम्ही उभारत आहोत. मुंबईत करण्यात आलेली गुंतवणूक आता 4 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. उच्च दर्जाची, शाश्वत आणि आधुनिक कार्यस्थळे निर्माण करण्यासाठी ब्रुकफिल्ड कटिबद्ध आहे."

ब्रुकफिल्ड ही भारतातील सर्वात मोठ्या कार्यालयीन मालक आणि ऑपरेटर कंपन्यांपैकी एक असून देशातील सात शहरांमध्ये सुमारे 55 दशलक्ष चौरस फूट क्षेत्राचे व्यवस्थापन करते. उच्च दर्जाच्या, ग्रेड-A प्रकल्पांची विकास व संचालन क्षमता कंपनीने सातत्याने सिद्ध केली आहे. पवईतील प्रस्तावित प्रकल्पाला उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी, सामाजिक सुविधा व मोठ्या प्रमाणातील कुशल मनुष्यबळाचा लाभ मिळणार आहे.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**
**शिक्षण विभाग**
पहिला मजला, झोझवाला शॉपिंग कॉम्प्लेक्स,
रामदेव हॉटेलच्या मागे, सहजानंद चौक, कल्याण (प)-421301
ई-मेल - ssakdmc@yahoo.co.in, ssa.kdmc@gmail.com
**शिक्षणाचा अधिकार**

**शुध्दीपत्रक**
**निविदा सुचना क्रमांक ११/२०२५-२०२६**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांची आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीकरिता आवश्यक सेवा सुविधा पुरविणेसाठी ई-निविदा**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ३ री ते ८ वी च्या अंदाजे 5300 विद्यार्थी व 100 शिक्षक असे एकूण 5400 व्यक्तींची (अंदाजे प्रति दिन 500 व्यक्ती 11 दिवसांसाठी) आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीसाठी नेहरु तारांगण व नेहरु सेंटर येथील प्रवेश फी (शो तिकिट), कल्याण ते मुंबई (परतीचा प्रवास) या प्रवासाकरिता एसटी महामंडळ यांचे बसेस सुविधा (भाडे तत्वावर विदयार्थ्यांचे विमा संरक्षणासह) उपलब्ध करुन घेणे, विदयार्थ्यांना व शिक्षकांना अल्पोहार/जेवण व्यवस्था तसेच विदयार्थ्यांना प्रवासाची सवय नसल्याने त्यांचे आरोग्याच्या दृष्टिने काळजी घेणेसाठी आवश्यक असणारी किरकोळ साम्रगी/साहित्य इ. करिता सेवा सुविधा पुरविणेसाठी अनुभवी संस्था/कंपनी/सेवा पुरवठादार यांचेकडून http://www.mahatenders.gov.in वर ई-टेंडर पध्दतीने देकार मागविण्याकरिता निविदा जाहिरात दिनांक ०९/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या निविदा मागविण्याचा कालावधी दिनांक ०९/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. पासून ते दिनांक १६/१२/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत हा असून निविदाकार यांना निविदेतील नियम, अटी, तांत्रिक बाबी स्पष्ट करण्यासाठी चर्चाकरिता प्री-बिड मिटींग (निविदापूर्व बैठक) दिनांक १५/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. उपआयुक्त (शिक्षण) यांचे दालन, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण येथे ठेवण्यात आलेली आहे.

जावक क्रमांक
कडोंमपा/जसंवि/मुका/७८७
दिनांक : १२/१२/२०२५

सही/-
(भारत मनसाराम बोरनारे)
प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

# डोंबिवलीत आजपासून आगरी महोत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : आगरी यूथ फोरमच्या वतीने २१ व्या अखिल भारतीय आगरी महोत्सवाला शुक्रवार १२ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. हा महोत्सव १९ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. महोत्सव डोंबिवलीतील संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलात होईल.

या महोत्सवाचे उद्घाटन माजी क्रिकेटपटू नीलेश कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्यासह आगरी समाजाचे ज्येष्ठ नेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, ज्येष्ठ नेते दशरथ पाटील, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, वनमंत्री गणेश नाईक, खासदार सुरेश म्हात्रे, संजय पाटील, खासदार श्रीकांत शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत. महोत्सवात आगरी संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविले जाते. सांस्कृतिक कार्यक्रमांसह आगरी खाद्यपदार्थांची मेजवानी असते. तसेच समाज प्रबोधनपर चर्चासत्रे आणि व्याख्याने होतात. नव कलाकरांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते अशी माहिती आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे यांनी दिली. यंदा महोत्सवाचे अध्यक्षपद शरद पाटील यांना देण्यात आले आहे.

दि. बा. पाटील एक व्यक्तिमत्व या परिसंवादात दि. बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील सहभागी होणार आहेत. दत्ता पाटील सिद्ध हस्त गीतकार या कार्यक्रमातून दत्ता पाटील यांच्या स्मृतींना उजाळा दिला जाणार आहे. १५ डिसेंबर रोजी प्रगती कॉलेजमध्ये आगरी बोलीभाषा साहित्य संमेलन होणार आहे.

विविध विषयांवर परिसंवाद

बोलीभाषा साहित्य व समाज हा परिसंवाद होईल. या परिसंवादात डॉ. मिलिंद जोशी यांच्यासह डॉ. श्रीपाद जोशी, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, डॉ. वर्षा तोडमल आदी सहभागी होणार आहेत. एआय या विषयावर डॉ. अच्युत गोडबोले हे मार्गदर्शन करणार आहेत. वयात येताना काय काळजी घ्यावी या विषयावर डॉ. गायत्री पाटील यांचे व्याख्यान होणार आहे.

# घणसोली स्थानकात वायरिंगचे जाळे कोसळले



सुदैवाने जीवितहानी नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : मध्य रेल्वेच्या ट्रान्स हार्बर मार्गावरील घणसोली रेल्वे स्थानकात मोठी दुर्घटना टळली. स्थानकाच्या फलाट क्रमांक २ जवळ भिंतीलगत असलेले वायरिंगचे जाळे आणि त्याला आधार देणारी संपूर्ण लोखंडी फ्रेम कोसळली. या घटनेनंतर प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे रेल्वे प्रशासनाकडून कळवण्यात आले आहे.शुक्रवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, फलाटालगत असलेल्या भिंतीवर अनेक केबल्स अचानक खाली कोसळल्या. त्यासोबत केबल्सना आधार देणारे लोखंडी स्ट्रक्चरही खाली आल्याने फलाट क्रमांक २ च्या कडेला संपूर्ण वायरिंग पसरले होते. त्या वेळी फलाटावर प्रवासी उपस्थित असले तरी सुदैवाने कोणतीही गंभीर घटना घडली नाही. या दुर्घटनेत एक प्रवासी किरकोळ जखमी झाला असला तरी त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचार देऊन सोडण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली. रेल्वे प्रशासनानुसार, स्थानक परिसरात वायरिंग दुरुस्ती आणि बदलण्याची कामे सुरू होती. देखभालकार्यादरम्यान एक केबल खेचताना आधार देणाऱ्या फ्रेमचा काही भाग तुटल्याने संपूर्ण वायरिंगचा ढिगारा खाली आल्याची प्राथमिक माहिती मिळाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# श्वानांसाठी निवारे उभारण्यास जागाच नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : भटके श्वान आणि नागरिक यांच्यात वाढत्या संघर्षाला आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना श्वानांना पकडून सुरक्षित आश्रयस्थाने उभारण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, शहरांची वेगाने वाढणारी लोकसंख्या, कमी होत चाललेली मोकळी जागा आणि मोठ्या क्षमतेच्या निवाऱ्यांची गरज यामुळे हा आदेश प्रत्यक्षात राबविताना महापालिका, नगरपालिका व नगरपंचायतींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातच सुमारे २५ हजार भटके श्वान असल्याची शक्यता आहे. प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने आपल्या क्षेत्रातील भटके श्वान पकडून त्यांच्या निवारा व संगोपनाची जबाबदारी पार पाडावी, असा न्यायालयाने आदेश दिला. तथापि, सर्व श्वानांना एकाच ठिकाणी आश्रय देण्यासाठी आवश्यक विस्तीर्ण जागा शहरात शोधणे जवळपास अशक्य झाले आहे. शिवाय अशा आश्रयस्थानी शेकडो श्वान राहणार असल्याने त्यांच्या भुंकण्यामुळे परिसरातील नागरिकांनाही होणाऱ्या त्रासापासून बचाव करण्यासाठी ध्वनिरोधक भिंतींचाही विचार करावा लागणार आहे.

**नागरिकांचा विरोध**

**विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, योग्य जागा उपलब्ध नसल्याने आश्रयस्थान उभारणीची प्रक्रिया ठप्प झाली. काही प्रस्तावित स्थळांवर नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविल्याने पालिकांना मागे हटावे लागले आहे.**

**अन्नासाठी ठिकाण निश्चितीवरून वाद पेटला**

**भटक्या श्वानांसाठी अन्न देण्याची ठिकाणे स्थानिक स्वराज्य संस्थांनी अधिकृतपणे निश्चित करावीत, तसेच अन्य ठिकाणी अन्न देणाऱ्यांवर कारवाई करावी, असे नियमावलीत म्हटले आहे.पूर्वी नेमलेल्या समितीने काही ठिकाणांची निवड केली होती. परंतु त्या ठिकाणांना नागरिकांनी विरोध दर्शविल्याने वाद वाढू लागला. परिणामी, नागरिक विरुद्ध 5 पालिका आणि पालिका विरुद्ध प्राणीप्रेमी असा तिहेरी संघर्ष निर्माण झाली. भटक्या श्वानांच्या समस्येवर ठोस तोडगा काढणे स्थानिक प्रशासनासमोर मोठे आव्हान बनले आहे.**

# कल्याण : मीटरवरील रिक्षा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली:** कल्याण पश्चिमेला मोठा गाजावाजा करून अलीकडेच सुरू झालेली मीटरवरील रिक्षा सेवा प्रवाशांच्या अल्प प्रतिसादामुळे बंद पडली. कल्याण स्टेशन परिसरात सुरू केलेली मीटर रिक्षा सेवा बंद होण्याबद्दल संघटनांनी आरटीओवर आरोप केले. प्रवाशांना मीटर पद्धतीने भाडे नाकारले तर दाद कुठे मागायची आरटीओ अधिकारी फक्त नावालाच एक दोन तास स्टेशन परिसरात उपलब्ध असल्याचे रिक्षा चालकांनी सांगितले.

कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात सकाळी सहा तेदुपारी दोन वाजेपर्यंत व दुपारी दोन ते रात्री दहा वाजेपर्यंत तसेच रात्रपाळीत शहर पोलिस व वाहतूक पोलिस कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या तक्रारींचा व्हॉटसअॅप तक्रार निवारण क्रमांक उपलब्ध नाही. एकाच कुटुंबातील तीन प्रवाशांकडून शेअर पद्धतीने दुप्पट, तिप्पट भाडे वसूल करणे अन्यायकारक आहे. कल्याणमध्ये रिक्षा मीटरने न चालण्यास आरटीओ आणि ट्रॅफिक विभाग कारणीभूत आहे. आम्ही सुरू केलेली सेवा प्रवाशांच्या अल्प प्रतिसादामुळे बंद झाली, असा आरोप रिक्षा टॅक्सी चालक मालक असोसिएशन कल्याण शहरचे जितेंद्र पवार यांनी केला आहे.

# मेट्रो १२ चा महत्त्वाचा शंभरावा टप्पा पूर्ण

## डोंबिवलीत १६० टनी गर्डरची यशस्वी स्थापना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ठाणे आणि नवी मुंबईला मेट्रोने जोडण्यासाठी 'कल्याण डोंबिवली तळोजा मेट्रो १२' मार्गिकचे काम हाती घेतले आहे. या मार्गिकच्या कामातील एक महत्त्वाचा टप्पा एमएमआरडीएने नुकताच यशस्वीरित्या पार केला. शिळफाटा रोडवरील डोंबिवली एमआयडीसी मेट्रो स्थानकाजवळ १०० वा यु-गर्डर स्थापित करण्यात आला.

यु आकाराच्या या गर्डरचे वजन १६० मेट्रीक टन इतके आहे. या कामाच्या अनुषंगाने आता मेट्रो मार्गिकच्या कामाला आणखी वेग येणार असून मार्गिकचे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण करून ही मार्गिका सेवेत दाखल केली जाणार आहे.

'ठाणे - भिवंडी - कल्याण मेट्रो ५' मार्गिकचा विस्तार मेट्रो १२ मार्गिकच्या माध्यमातून केला जात आहे. २३.५७ किमी लांबीच्या आणि १९ मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. कळवा - शिळफाटा -तळोजा मार्गाला समांतर अशी ही मार्गिका असून कळवा येथे ही मार्गिका मेट्रो ५ मार्गिकांशी, हेदुटणे येथे मेट्रो १४ मार्गिकांशी (कांजूरमार्ग ते बदलापूर) आणि अमनदूत येथे नवी मुंबई मेट्रो १ मार्गिकशी जोडली जाणार आहे. या मार्गिकचे काम मार्च २०२४ मध्ये सुरू झाले. फेब्रुवारी २०२५ पर्यंत या प्रकल्पाचे केवळ सात टक्के काम झाले होते. त्यानंतर मात्र एमएमआरडीएने कामाला वेग दिला असून नुकताच या कामातील एक महत्त्वाचा टप्पा यशस्वीरित्या पार करण्यात आला.



शिळफाटा रोडवरील डोंबिवली एमआयडीसी मेट्रो स्थानकाजवळ १०० वा यु-गर्डर स्थापित करण्यात आला. या गर्डरचा स्पॅन २८ मीटर असून या गर्डची रुंदी ५.२५ मीटर आहे. हा गर्डर १६० मेट्रीक टन वजनाचा आहे. मार्गिकतील १०० वा गर्डर स्थापित झाल्याने आता मेट्रो १२ च्या कामाला वेग येणार आहे. ठाणे नवी मुंबई असा थेट प्रवास मेट्रोने करण्यासाठी प्रवाशांना मे २०२८ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे. या मार्गिकचे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण करून मार्ग्रिकेच्या संचलनासाठी सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त करून ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल करण्यात येणार आहे.

# भिवंडीत अल्पवयीन मुलगी बेपत्ता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : शहरातील नागाव परिसरातून १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. शांतीनगर पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, मंगळवारी (ता. ९) सकाळी ही मुलगी घरातून गेली, पण परत आली नाही. कुटुंबाने आजूबाजूच्या परिसरात तिचा शोध घेतला, परंतु ती सापडली नाही. कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनंतर शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY



Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# ठाण्यात जीएसटी अधिकाऱ्यांचा एल्गार

## जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर सलग दुसऱ्या दिवशी निदर्शने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राज्य वस्तू आणि सेवा कर कार्यालयामधील अधिकाऱ्यांनी ८ डिसेंबरपासून आंदोलनाचा पवित्रा हाती घेतला आहे. शुक्रवारी अधिकाऱ्यांनी कामबंद आंदोलन केले. त्यामुळे त्याचा परिणाम विभागातील कामकाजावर झाला.

अधिकाऱ्यांच्या आसन व्यवस्था आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, विभागाची अपूर्ण पूनर्रचना, इंटरनेट आणि तांत्रिक सेवेतील अडचणी, रखडलेली पदोन्नती आणि बदल्या, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची पदे तात्काळ भरणे अशा विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर राजपत्रित अधिकारी संघटनेने ८ डिसेंबरपासून आंदोलन पुकारले आहे. राज्य भरातील वर्ग एक आणि वर्ग दोन मधील अधिकारी या आंदोलनात सहभागी झाले. १० डिसेंबरला अधिकाऱ्यांनी सामूहिक रजा आंदोलन केले. तर ११ डिसेंबरापासून कामबंद आंदोलन सुरु केले.

सलग दुसऱ्या दिवशी अधिकाऱ्यांनी कामबंद आंदोलन केल्याने त्याचा परिणाम जीएसटी विभागाच्या कामकाजावर झाला. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ राज्य वस्तू आणि सेवा कर कार्यालय आहे. या विभागातील ७७ अधिकारी सहभागी झाले होते. त्यांनी कार्यालयाबाहेर आंदोलन करत मागण्या मान्य करण्याची मागणी सरकारला केली.

# राजकीय बैठक नव्हे, तर आयुष्याचा धडा !

## ७ लोककल्याण मार्गावरील श्रीकांत शिंदेंचा अविस्मरणीय अनुभव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) खासदारांसोबत स्नेहभोजन आयोजित केला होता. या स्नेहभोजनास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे देखील उपस्थित होते. या स्नेहभोजनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून त्यांच्या बालपणाचे आणि इतर किस्से ऐकून शिंदे हे अत्यंत प्रभावित झाले. त्यांनी मोदी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करत आयुष्यातील हा अविस्मरणीय क्षण असल्याचे म्हटले. त्याबाबतची पोस्ट त्यांनी समाजमाध्यमांवर शेअर केली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एनडीएच्या खासदारांसाठी गुरुवारी सायंकाळी दिल्लीतील ७ लोक कल्याण मार्ग येथे स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. याबाबतचे छायाचित्र मोदी यांनी समाजमाध्यमावर प्रसारित केले आहे. त्यामध्ये मोदी यांच्यासोबत राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल, शिंदे गटाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे दिसत आहेत. या स्नेहभोजनानंतर शिंदे यांनी मोदी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर ही पोस्ट शेअर केली.

काय म्हणाले श्रीकांत शिंदे

७, लोककल्याण मार्ग येथे आपल्या सोबत जवळपास दीड तास घालवण्याची संधी मिळाली. याबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे. ही भेट फक्त आणखी एक राजकीय बैठक ठरू शकली असती, पण तिचे रूपांतर माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभवात झाले. दिल्लीची थंड हवा त्या दिवशी वेगळीच उबदार वाटत होती. आपण आपल्या बालपणीच्या संघर्षांच्या कथा सांगितल्या. नेतृत्वाबद्दलचे विचार मांडले आणि सार्वजनिक जीवनातील दशकांच्या अनुभवाने शिकवलेल्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी शेअर केल्या. मला अजूनही आठवते, मी विचारलं होतं, "आपण एवढा ताण कसा सांभाळता?" तेव्हा आपण अगदी शांतपणे दिलेले उत्तर आजही माझ्या मनात कोरले आहे.

# जीवनदीप महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाची डोंबिवली नागरी सहकारी बँक टिटवाळा येथे अभ्यास भेट




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण** : अर्थशास्त्र विभागातून आपले शिक्षण पूर्ण करणारे बहुतांश विद्यार्थी हे बँकिंग क्षेत्राकडे वळताना दिसतात; त्यांना बँकेमध्ये चालणारे कामकाज योग्य प्रकारे समजावे, कळावे याकरिता जीवनदीप महाविद्यालय गोवेली अर्थशास्त्र विभागाची मंगळवार दिनांक ०९- १२- २०२५ रोजी अभ्यास भेट देण्यात आली. याचा उद्देश विद्यार्थ्यांना बँकेचे दैनंदिन व्यवहार, विविध प्रकारची खाती, ठेवी, कर्ज सुविधा तसेच डिजिटल बँकिंग सुविधा यांबाबत प्रत्यक्ष अनुभव मार्गदर्शन मिळणे हे ध्यानात ठेवून सदर अभ्यास भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून सौ. नम्रता निमकर (शाखा मॅनेजर) या लाभल्या तसेच नितीन भिंगरे व सौ. नेहा जोशी (सहाय्यक शाखा मॅनेजर) यांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन केले व बँकेतील कामकाज कशा प्रकारे चालते याची माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगितली व विद्यार्थ्यांनीही ती प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे आत्मसात केली. जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रवींद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे यांचे मोलाचे मार्गदर्शन या अभ्यास भेटीला लाभले. प्रा. डॉ. मनीषा काकडे प्रा. मीना मुळीक या अभ्यास भेटीदरम्यान उपस्थित होत्या विद्यार्थी प्राध्यापक यांच्या एकत्रित सहभागाने सदर अभ्यास भेट यशस्वीरित्या संपन्न झाली

# वालधुनी उड्डाण पुलाच्या दुरुस्तीला सुरुवात

## सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत कल्याणकरांना वाहतूक कोंडीतच करावे लागणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण** : शहाड उड्डाण पूलाची दुरुस्ती त्यानंतर कल्याण पूर्वेतील धर्मवीर आनंद दिघे उड्डाण पुलाच्या दुरुस्ती पाठोपाठ आता कल्याण उल्हासनगर शहराला जोडणाऱ्या कल्याण पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद्र बोस चौकातील उड्डाण पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले असून या पुलाच्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी पूल १५ डिसेंबर पासून वीस दिवस बंद ठेवण्यात येणार असून या पुलाचे काम पूर्ण होण्यास नवीन वर्ष उजाडणार असल्याने सरत्या वर्षातही कल्याण डोंबिवली करांना वाहतूक कोंडीचे भूत मानगुटीवर बसणार आहे. गेल्या नोव्हेंबर महिन्यात कल्याण नगर जोडणारा महत्वाच्या राष्ट्रीय मार्गा वरील शहाड पुलाच्या दुरुस्ती काम राष्ट्रीय महामार्ग विभागाने हाथी घेत सदरचा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. तब्बल वीस दिवस दुरुस्तीच्या कामासाठी शहाड उड्डाण पूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. उड्डाण पुलाच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम झाल्यावर हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. शहाड पुलाच्या दुरुस्तीचे काम होताच पालिकेने कल्याण पूर्व विठ्ठलवाडी शहराला जोडणारा एफ केबिन वालधुनी धर्मवीर आनंद दिघे उड्डाण पुलाच्या दुरुस्तीचे काम पालिकेच्या बांधकाम विभाग कडून करण्यात आले होते. या पुलाचे काम पूर्ण करून पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

कल्याण मुरबाड रस्त्या वरील नेताजी सुभाष चंद्र बोस उड्डाण पुलावरील जागोजागी रस्त्यावर पडलेल्या खड्डया मुळे नेहमीच वाहतूक कोंडी होत असल्याने पालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी या उड्डाण पुलाची पाहणी करून या पुलावरील दुरुस्तीचे निर्देश दिले होता. पालिका प्रशासनाने धर्मवीर आनंद दिघे उड्डाण पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यावर आता आर.ओ.बी -४१, नेताजी सुभाष चंद्र बोस उड्डाण पुलाच्या दुरुस्ती साठी काम हाथी घेतले आहे. या पुलाच्या बेरिंग रिपेरिंगचे काम झाले असून उड्डाण पुलाच्या रस्त्याचे जूने डांबर काढण्याचे काम.सुरू करण्यासाठी रस्त्या खोदण्यात आला असून मास्टिंग अल्फास्टिंक चे काम सुरू करण्यात आले आहे. या उड्डाण पुलाच्या रस्त्याच्या कामाची दुरुस्ती तसेच रंगरंगोटी करण्यासाठी येत्या १५ डिसेंबर २०२५ ते १० जानेवारी २०२६ या कालावधीत वीस दिवस उड्डाण पूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या उड्डाण पूल वरील वाहतूक बंद ठेवण्यासाठी वाहतूक वळविण्यासाठी वाहतूक पोलिस विभागाकडून सूचना अद्यापही काढण्यात आली नसली तरी येत्या दोन दिवसात वाहतूक पोलिसांकडून वाहतूक वळविण्याचे सूचना काढली जाण्याची शक्यता आहे. पालिकेच्या धर्मवीर आनंद दिघे उड्डाण पुल,नेताजी सुभाष चंद्र बोस उड्डाण पूल तसेच कल्याण पूर्वेतील काटेमानिवली येथील प्रल्हाद शिंदे उड्डाण पूल या तीन उड्डाण पुलाच्या दुरुस्ती च्या कामासाठी ६ कोटी ७४ लाख रुपये खर्चाच्या निधीची तरतूद केली आहे.

# कल्याण डोंबिवलीत थंडीचा जोर वाढला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असताना दुसरीकडे शहरांतील तापमानाचा पारा मात्र दिवसागणिक कमी होताना दिसत आहे. थंड हवेच्या ठिकाणासाठी देशभरात प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वरमध्ये आज 12.2 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली तर कल्याणात त्यापेक्षा थोडे अधिक म्हणजे 12.8 अंश सेल्सिअस इतक्या निच्चांकी तापमानाची नोंद झाल्याची माहिती हवामान अभ्यासक अभिजित मोडक यांनी दिली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून कल्याण डोंबिवलीतील तापमानाचा पारा खाली खालीच येत चालला आहे. त्यामुळे आज लागोपाठ दुसऱ्या दिवशी यंदाच्या महिन्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. काल म्हणजे गुरुवारी 11 डिसेंबर रोजी कल्याण डोंबिवलीमध्ये अवघ्या 13 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. त्यापाठोपाठ आज कल्याण डोंबिवलीतील तापमान आणखी कमी झाले असून कल्याणमध्ये तर चक्क 12.8 अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले आहे. तर हिल स्टेशनमध्ये सर्वात लाडके डेस्टिनेशन असलेल्या महाबळेश्वर येथे 12.2 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्याची माहिती हवामान अभ्यासक अभिजित मोडक यांनी दिली आहे. त्यापाठोपाठ डोंबिवलीचा पाराही कालच्या 13.7 अंश सेल्सिअसवरून आज 13.4 अंश सेल्सिअस इतका नोंदवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# गोवेली येथे सिकलसेल सप्ताह व जनजागृती पंधरवडा गटविकास अधिकारी व सभापतींची उपस्थिती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**कल्याण** : महाराष्ट्रात ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभाग जिल्हा परिषद ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण तालुक्यातील दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पुढाकाराने गोवेली येथे आयोजित सिकलसेल सप्ताह व जनजागृती पंधरवडा कार्यक्रमासाठी कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा जीवनदिप महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोंडविंदे आणि पत्रकार संजय कांबळे यांनी उपस्थिती लावली व मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे कौतुक करुन या शिबिरांचा नागरीकांनी लाभ घ्यावा असे अवाहन त्यांनी केले. सिकलसेस हा लाल रक्त पेशींमध्ये होणारा आजार आहे,सर्वसाधारण व्यक्तींच्या शरीरातील लाल पेशींचा आकार गोल असतो,पण या आजारांमध्ये पेशींचा आकार आक्सिजन मिळाला नाही तर विळ्या सारखा होतो.ह्या आजारास विळ्या सारखा दिसणा-या पेशींचा आजार म्हणजेच सिकलसेल आजार म्हणतात.याची लक्षणे हातापायाला सुज येणे,असाहाय्य वेदना,पक्षाघात,मानसिक त्रास, जंतुसंसर्ग अशी लक्षणे दिसून येतात. यासाठी या शिबीरात रायते, मानिवली, अनखर, गोवेली, ठाकूरपाडा, वाहोली, आणे भिसोळ, म्हसकळ, आदी गावातून महिला मुले तपासणी करिता आले होते सुमारे ५०ते७५च्यावर महिलांनी, गरोदर मातांनी याचा लाभ घेतला,दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ पूनम जयकर, स्नेहा फांऊंडेशन च्या कांचन पोल, यांनी सिकलसेल या आजाराची माहिती दिली. तर कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी यांनी या शिबीराचे कौतुक केलं, सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केल्याने समाधान व्यक्त केले. तर जीवनदिप महाविद्यालयाचे अध्यक्ष तथा बाजार समितीचे सभापती रवींद्र घोंडविंदे सर यांनी अशा शिबीराचे आयोजन केल्याने कल्याण तालुका हा सिकलसेल मुक्त होईल असा विश्वास व्यक्त केला. तर पत्रकार संजय कांबळे यांनी ही दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे कौतुक केलं व शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अस्मिता बागडे(लॅब टेक्नीशियन,) अश्विनी कोकाटे, डॉ स्वाती चव्हाण, योगिता जाधव, दिपक शिर्के, संजय कांबळे, अर्पिता सांबरे, सध्या गायकवाड, राजाराम निचिते, गौरव सुरडकर, सुजित अडसुळे, हर्षदिप गव ई,वनदेव गव ई,निलेश पाटील, नम्रता गायकर, सविता बनकर आशा वर्कर्स इत्यादी सर्वांनी परिश्रम घेतले,पण तरीही तालुका आरोग्य अधिकारी डॉ आशा मुंजाळ यांची गैरहजेरी प्रकर्षाने जाणवत होती.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### वैद्यकीय आरोग्य विभाग

दुरध्वनी क्रमांक ०२५१-२२०४३०४ ईमेल: moh.kdmc@gmail.com

### जाहीर सूचना

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना जाहीर सूचित करण्यात येत आहे की, जे नागरीक /प्राणी प्रेमी संस्था / संघटना मोकाट श्वानांना अन्न खाऊ घालत आहेत. त्यांनी पशुवैद्यकीय सेवा कक्ष, आरोग्यविभाग, २ रा मजला अग्निशमन कार्यालय, सोनवणे महाविद्यालय समोर, आधारवाडी कल्याण येथे अर्ज सादर करावा. या अर्जामध्ये मोकाट श्वानांना ज्या ठिकाणी अन्न खाऊ घालत आहे त्या ठिकाणाबाबत सविस्तर माहिती, अन्न खाऊ घालण्याची वेळ, अन्न खाऊ घालत असलेल्या मोकाट श्वानांची अंदाजित संख्या इत्यादी सविस्तर माहिती या अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. सदर अर्जाचा नमूना महानगरपालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सर्व नागरिक/प्राणी प्रेमी संस्था तसेच प्राणी प्रेमी व्यक्ती यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला १५ (पंधरा) दिवसाचे आत मोकाट श्वानांना अन्न खाऊ घालत असलेल्या ठिकाणाबाबतची माहिती सादर करण्यात यावी, या आधारे मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्देशानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये मोकाट श्वानांना अन्न खाऊ घालण्याचे ठिकाणे आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून निश्चित करण्यात येतील.

**सही /-**
**उपायुक्त (आरोग्य विभाग)**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

*जा.क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/ ७८६ दिनांक-१२/१२/२०२५

# तेजोमय युवा प्रतिष्ठानच्या शैक्षणिक मार्गदर्शन शिबिराला सुरवात

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**




**कल्याण** : तेजोमय युवा प्रतिष्ठान, श्रीमलंगगड यांच्यातर्फे १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित तीन दिवसीय मोफत मार्गदर्शन शिबिराला सुरवात झाली आहे. या शिबिराचे उदघाटन श्री शनैश्वर देवस्थान, करवले येथे शिक्षणप्रेमी-समाजसेवक प्रणव गायकवाड यांच्याहस्ते संपन्न झाला.

मलंगगड परिसरातील आठ शाळांमधील सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून या उपक्रमाला अत्यंत प्रेरणादायी प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी या शिबिरात अधिव्याख्याता दिनेश चौधरी आणि व्याख्याते विश्वास भोईर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी कृ. ऊ. बा. स. उल्हासनगर संचालक राजेंद्र वारे, महात्मा गांधी स्कूलचे मुख्याध्यापक अजयकुमार जोगी, संस्थेचे अध्यक्ष जीवन मढवी, अविनाश साळवी तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दिशेने असे उपक्रम अधिक सक्षम आणि प्रेरणादायी पावलांचे द्योतक असल्याचे मत प्रणव गायकवाड यांनी व्यक्त केले.

या मार्गदर्शन शिबिरात व्याख्याते गणित भाग-१ विश्वास भोईर, गणित भाग२ किशोर चौधरी, इंग्रजी परब व योगिता पाटील, विज्ञान दिग्विजय पाटील, इंग्रजी ग्रामर संजय मराठे आदीं तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. मान्यवरांचे स्वागत जिल्हा परिषद मराठी शाळा भालच्या विद्यार्थ्यांनी लेझीम प्रात्यक्षिक दाखवून केले. दिनेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा व पाठांतर कसे दिर्घकाळ स्मरणात ठेवावे, आयुष्यात शिक्षणाचे महत्व समजावून सांगितले असल्याची माहिती तेजोमय युवा प्रतिष्ठान श्रीमलंगगड संस्थेचे जीवन मढवी यांनी दिली.

# केडीएमसी निवडणूक प्रचार प्रमुख पदी काँग्रेसचे सचिन पोटे

## पोटे यांच्या नियुक्ती बाबत काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी मानले आभार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : काँग्रेसच्या कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणूक प्रचार प्रमुख पदी माजी जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांची नियुक्ती करण्यात आली असून पोटे यांच्या या नियुक्तीनंतर नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी आनंद व्यक्त करत पक्षाचे आणि पक्षाच्या वरिष्ठांचे आभार मानले असून पोटे यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ तसेच अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव, माजी आमदार आणि मध्यप्रदेश राज्याचे प्रभारी संजय दत्त यांच्या आदेशानुसार कल्याण-डोंबिवली शहर जिल्हा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष व माजी नगरसेवक सचिन पोटे यांची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संजय दत्त यांच्याहस्ते पोटे यांना याबाबतचे नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सुरेंद्र आढाव, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर, महिला जिल्हाध्यक्षा कांचन कुलकर्णी, विमल ठक्कर, मुन्ना तिवारी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

काही दिवसांपूर्वीच काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी आपल्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. पोटे यांच्या राजीनाम्या नंतर पोटे समर्थकांनी देखील काँग्रेस पक्ष श्रेष्ठींवर नाराजी व्यक्त करत आपल्या पदाचे राजीनामे दिले होते. या राजीनामा सत्रानंतर सचिन पोटे हे शिवसेना किंवा भाजपा मध्ये प्रवेश करणार अशी चर्चा होती. मात्र सचिन पोटे यांची नाराजी दूर करण्यात पक्षाला यश आले असून त्यांच्यावर कल्याण डोंबिवली निवडणूक प्रचार प्रमुख पदाची जवाबदारी देण्यात आली आहे.

तर या निवडीनंतर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी आनंद व्यक्त करत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव संजय दत्त आणि इतर पक्ष श्रेष्टींचे आभार मानले आहेत. सचिन पोटे यांचे देखील अभिनंदन करत पोटे यांच्या नेतृत्वाखाली येणारी निवडणूक लढवून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेवर काँग्रसचा झेंडा फडकविण्यासाठी प्रयत्न करू. पोटे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष अधिक बळकट होईल आणि जनतेच्या हितासाठी कार्यरत राहील अशी आम्हाला पूर्ण खात्री असल्याचे पातकर यांनी सांगितले.

# ठाणे महापालिका परिवहन सेवेतून वाहक अंकुश जाधव यांची सेवानिवृत्ती




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : वासिंद जवळील भातसई गावातील अंकुश हरिभाऊ जाधव हे ठाणे महानगरपालिका परिवहन विभाग वाहक पदावरून सेवानिवृत्ती झाले आहेत.

अंकुश जाधव यांनी ठाणे महानगरपालिका परिवहन विभागामध्ये वाहक ह्या पदावर तब्बल 32 वर्षे निष्कलंकित व प्रामाणिकपणे सेवा केली. त्यांच्या या सेवानिवृत्त निमित्ताने सेवापूर्ती सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गावात श्री गाडगे महाराज भजन मंडळ सदस्य व ग्रामस्थ, नातेवाईक मित्र मंडळी यांनी हरिपाठ म्हणत स्वागत केले व गावातील महिलांनी आरती ओवाळून त्यांचे औक्षण केले.

ह.भ.प. अंकुश जाधव यांनी गावात हरिपाठ व वारकरी संप्रदायसाठी प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या या सेवापूर्ती कार्यक्रमा निमित्ताने भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील यांचे सुश्राव्य किर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या या सेवापूर्ती सोहळ्यावेळी विविध राजकीय, सामाजिक पदाधिकारी, कार्यकर्ते व वारकरी संप्रदायातील मंडळी, नातेवाईक, मित्र परिवार, ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी त्यांचे अभिनंदन करून उर्वरित आयुष्य सुख समाधानाचे जावो यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# टोपी वरून वाद : गरोदर महिलेच्या पोटात लाथ मारल्याने बाळाचा मृत्यू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोक्यावरील टोपी काढून ती टोपी आरोपीन स्वताच्या डोक्यात घातली. त्यानंतर हीच टोपी तक्रारदार यांनी आरोपीच्या डोक्यावरून काढून आपल्या मित्राला पुन्हा परत दिली. याच गोष्टीचा आरोपीला राग येऊन शेजाऱ्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीत आरोपीन गरोदर असलेल्या महिलेच्या पोटात जोरात लाथ मारल्याने तिच्या पोटातील बाळाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना कल्याण नजीक मोहने गावातील लहूजीनगरच्या मैदनात घडली आहे. याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

बाबा उर्फ नवाब अस्लम शेख (वय २४) , शबीर अस्लम शेख (वय ३५), अपसर

## खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

अस्लम शेख (वय ३०) शहारुख शेख (वय २७ ) (सर्व राहणार लहूजीनगर, मोहने) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे असून चारही आरोपी फरार झाले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार मोनू फुलारी (वय २१) हा मोहने गावातील लहूजीनगर मध्ये राहत असून त्याच्याच शेजारी चारही आरोपी कुटूबांसह राहतात. त्यातच ९ डिसेंबर रोजी रात्री साडे आठ वाजल्याच्या सुमरास लहूजीनगरच्या मैदनात आरोपी बाबा उर्फ नवाब याने तक्रारदार मोनू यांचा मित्र बिगर कांबळे यांच्या डोक्यातील टोपी काढून स्वताच्या डोक्यात घातली. त्यानंतर हीच टोपी तक्रारदार मोनू यांनी आरोपीच्या डोक्यावरून काढून मित्र कांबळे यांना परत दिली. टोपी काढल्याच्या रागातून आरोपी बाबा उर्फ नवाब याने मारहाण करत इतर आरोपींना बोलवून तक्रारदार मोनू आणि त्याच्या मित्र बिगर कांबळे या दोघांना हॉकीस्टिकने बेदम मारहाण करीत असतना तक्रारदार मोनू यांची मावशी या भांडण सोडविण्यासाठी आल्या असता आरोपी शहारुख याने त्यांच्या पोटात जोरात लाथ मारली.खळबळजनक बाब म्हणजे त्या गोरदार होत्या. त्यातच त्यांच्या पोटात आरोपीन लाथ मारल्याने त्यांच्या बाळाचा पोटातच मृत्यू झाला. दरम्यान,त्या महिलेला मुंबईतील सायन रुग्णालयात दाखल करून त्यांच्या पोटातील मृत्यू बाळ तातडीने शास्त्रक्रिया करून बाहेर काढल्यान त्यांचा जीव बचावला. याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात चारही आरोपीवर गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्यांचा शोध सुरु केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांनी दिली आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024